# माथाडी मंडळाच्या प्रशासकीय कामकाजामध्ये सुधारणा सुचविण्यासाठी गठित केलेल्या उप समितीचा अहवाल

शासनास अहवाल सादर केल्याचा दिनांक : १५ डिसेंबर, २०१८


प्रविण जाधव
सदस्य-सचिव तथा
सहायक कामगार आयुक्त (माथाडी)

रविराज इळवे
अध्यक्ष तथा
प्रभारी सह आयुक्त कामगार (माथाडी)


कामगार आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.

# अ नु क्र म णि का



| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्रमांक |
| --- | --- | --- |
| १. | प्रस्तावना | ३ ते ५ |
| २. | कार्यपध्दती | ६ ते ७ |
| ३. | माथाडी मंडळांच्या प्रशासकीय कामकाजामध्ये सुधारणा करणेबाबत कारणमिमांसेसह शिफारशी. | |
| | १) कायदा व योजनेतील सुधारणा | ८ ते १९ |
| | २) सामाजिक सुरक्षा योजनांचे व्यवस्थापन- | १९ ते २२ |
| | ३) मंडळांच्या कामकाजातील आर्थिक व्यवस्थापन व प्रशासकीय सुधारणा | २२ ते ३० |

# प्रस्तावना

मुंबई या देशाच्या आर्थिक राजधानीत माथाडी कामगारांची चळवळ उभारुन स्वर्गीय आण्णासाहेब पाटील यांनी माथाडी कामगारांच्या न्याय हक्कांसाठी लढा सुरु केला. स्व. मनोहर कोतवाल, डॉ. बाबा आढाव इत्यादी नेत्यांच्या सहभागाने सदर चळवळीला राज्यव्यापी स्वरुप प्राप्त झाले. सदर चळवळीचा परिपाक म्हणजे महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ या असंघटीत क्षेत्रातील कामगारांसाठीच्या पहिल्या कायद्याची निर्मिती होय. या कायद्याने माथाडी कामगारांच्या जीवनात फार मोठे स्थित्यंतर घडवून आणले आहे. या देशाला पथदर्शी ठरलेल्या कायदयाच्या अंमलबजावणीस ५० वर्षे पूर्ण होत असताना, सदर कायद्याचा गैरवापर होत असल्याच्या तक्रारी विविध घटकांकडून प्राप्त झाल्याने माथाडी मंडळांच्या कार्यालयीन कामकाजाची चौकशी करण्याबाबत माथाडी अधिनियमांच्या कलम २३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन शासनाने मा.श्री. पंकज कुमार (भा.प्र.से.), विकास आयुक्त (असंघटीत कामगार), मुंबई यांची एक सदस्यीय चौकशी समिती दि. १०.४.२०१८ रोजी स्थापन केली होती. सदर समितीने आपला चौकशी अहवाल शासनास दिनांक २०.१०.२०१८ रोजी सादर केला असून, त्याद्वारे केलेल्या शिफारशींबाबत शासन स्तरावर कार्यवाही करण्यापूर्वी मंडळाचे सध्याचे कामकाज, रचना, येणाऱ्या अडचणी, माथाडी कामगारांचे प्रश्न व त्यावर करावयाच्या उपाययोजना या अनुषंगाने अभ्यास करुन शासनास अहवाल सादर करण्यासाठी शासन निर्णय क्र.युडब्ल्यूए-२०१८/प्र.क्र. ७८९/कामगार-५, दिनांक २९ ऑक्टोबर, २०१८ द्वारे सदर उपसमिती नेमण्यात आली असून, या उपसमिती मध्ये पुढीलप्रमाणे अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे.

५. मंडळाचे कार्यालय व मालमत्ता व याबाबतच्या नोंदी घेणे व त्याबाबत सूचना सुचविणे.

६. मंडळाच्या बँक ठेवी, कागदपत्र वर्गीकरण इत्यादीबाबत सध्याचे धोरण व त्यात आवश्यक सुधारणा करणेसाठी सूचना करणे.

७. मंडळाच्या कार्यपध्दतीमध्ये सुसूत्रीकरण व सुधारणा करण्याच्या दृष्टीने उपाययोजना सुचविणे.

८. माथाडी कामगारांचे वेतन, बोनस, दंडाची रक्कम इत्यादी अदा करणे व कामगारांच्या खात्यामध्ये थेट जमा करणे त्याचप्रमाणे नियमानुसार करावयाच्या कपाती व्यवतिरिक्त इतर कपातीबाबत ECS पध्दतीद्वारे कपात करण्याबाबत कार्यपध्दती निश्चित करणे या संदर्भात सूचना करणे.

***********

# कार्यपध्दती

सदर उपसमितीची स्थापना दिनांक २९.१०.२०१८ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे झाली असून, अहवाल सादर करण्याची कालमर्यादा कामकाजाचे ८ दिवस एवढी देण्यात आली होती. उपसमितीकडे सोपविण्यात आलेले विषय विचारात घेऊन ८ दिवसांचा हा कालावधी अल्प असल्याने उपमितीच्या दिनांक ०३ नोव्हेंबर,२०१८ रोजीच्या पहिल्या बैठकीतच दोन महिन्यांची मुदतवाढ देण्याबाबत शासनास विनंती करण्याचा एकमताने निर्णय घेण्यात आला व त्यानुसार शासनास दि. ०६.११.२०१८ रोजीच्या पत्राद्वारे विनंती करण्यात आली होती. शासनाने सदर विनंती अंशत: मान्य करुन समितीच्या कामकाजास दि. १२.१२.२०१८ रोजीच्या पत्राद्वारे दि. १५.१२.२०१८ पर्यंत मुदतवाढ दिली आहे.

उपसमितीच्या विचारार्थ विषयांबाबत चर्चा करण्यासाठी व त्या विषयांच्या अनुषंगाने उपलब्ध आकडेवारी, दस्तऐवज व इतर कागदपत्रे विचारात घेण्यासाठी दिनांक ०३.११.२०१८, १४.११.२०१८, १९.११.२०१८ व ०३.१२.२०१८ रोजी उपसमितीचे अध्यक्ष तथा प्रभारी सह आयुक्त कामगार (माथाडी), मुंबई श्री. रविराज इळवे यांच्या अध्यक्षतेखाली कामगार आयुक्त कार्यालयात बैठकांचे आयोजन करण्यात आले होते.

सदर उपसमितीवर नेमण्यात आलेल्या बहुतांश अधिकाऱ्यांना माथाडी मंडळाच्या कामकाजाचा प्रदीर्घ अनुभव असल्याने व ते सध्याही महत्वाच्या माथाडी मंडळांवर कार्यरत असल्याने उपसमितीच्या बैठकांमध्ये अतिशय मुद्देसुद चर्चा झाल्या. मंडळाच्या कामकाजातील प्रात्यक्षिक स्वरुपातील अडचणींवरील उपाययोजना या विचार मंथनातूनच पुढे आल्या. आंतरराष्ट्रीय श्रम संघटना (ILO) द्वारे माथाडी मंडळांमधील त्रिपक्षीय प्रक्रिया या विषयावर दि. ०५ ते ०७ सप्टेंबर, २०१८ या कालावधीत बैठका आयोजित केलेल्या होत्या. या बैठकांमध्ये राज्यातील प्रमुख

कामगार संघटनांचे प्रतिनिधी, प्रमुख मालक संघटनांचे प्रतिनिधी आणि माथाडी मंडळांवर कार्यरत अध्यक्ष, सचिव, कार्मिक अधिकारी इत्यादी शासन प्रतिनिधींचा सहभाग होता. या बैठकांमध्ये झालेले त्रिपक्षीय विचारमंथन या उपसमितीच्या कामकाजात विचारात घेतलेले आहे.

मा. विकास आयुक्त (असंघटीत कामगार), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सादर केलेला दिनांक २०.१०.२०१८ रोजीचा एक सदस्यीय चौकशी समितीच्या अहवालातील निष्कर्ष उपसमितीच्या कामकाजात मार्गदर्शक ठरलेले असून, त्यावर सखोल चर्चा उपसमितीच्या बैठकांमध्ये झाली आहे.

या उपसमितीच्या कार्यकक्षेत असलेले एकूण ८ विषयांबाबत चर्चा करत असताना ते एकमेकांशी संलग्न असल्याने त्या विषयांची खालीलप्रमाणे ३ विषयात विभागणी करण्यात आली.

१. कायदा व योजनेतील सुधारणा

२. सामाजिक सुरक्षा योजनांचे व्यवस्थापन

३. मंडळांच्या कामकाजातील आर्थिक व्यवस्थापन व प्रशासकीय सुधारणा

उपसमितीच्या विचारार्थ नेमून दिलेल्या कार्यकक्षेतील प्रत्येक विषयाबाबत स्वतंत्रपणे चर्चा करण्यात आलेली असून, विषय निहाय प्रचलित कार्यपध्दती व त्या विषयाच्या अनुषंगाने असलेल्या कायदेशीर तरतुदी, शासनाचे निर्देश, शासन निर्णय विचारात घेतलेले आहेत. तसेच कामगार आयुक्त कार्यालयातील माथाडी शाखेतील उपलब्ध आकडेवारी, सांख्यिकी माहिती व इतर दस्तऐवज उपसमितीने विचारात घेतलेला आहे. तसेच उपसमितीच्या कामकाजाच्या प्रगतीबाबत मा. कामगार आयुक्त, शासनाचे उपसचिव तसेच मा.प्रधान सचिव (कामगार) यांना वेळोवेळी अवगत करण्यात आले आहे.

*********

# माथाडी मंडळांच्या प्रशासकीय कामकाजामध्ये सुधारणा करणेबाबत कारणमिमांसेसह शिफारशी.

## १) कायदा व योजनेतील सुधारणा

### अ) कायद्यातील सुधारणा -

महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ या कायद्याची अंमलबजावणी राज्यात मागील सुमारे ५० वर्षांपासून होत आहे. या प्रदीर्घ कालोघात सदर कायद्याच्या अंमलबजावणी मध्ये वेळोवेळी उद्भवलेल्या अडचणी विचारात घेऊन या कायद्याची अधिक प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी ही उपसमिती खालीलप्रमाणे सुधारणा सुचवित आहे -

#### I. कलम ५ मधील सुधारणा –

या कलमाच्या तरतुदीनुसार सदर कायद्यांतर्गत तयार करण्यात आलेली योजना विशिष्ट वर्गाच्या असंरक्षित कामगारांना अथवा मालकांना लागू आहे किंवा कसे, असा प्रश्न निर्माण झाल्यास ती बाब राज्य शासनाकडे निर्णयासाठी संदर्भित करण्यात येईल व राज्य शासन सदर कायद्यानुसार स्थापित सल्लागार समितीशी सल्लामसलत करुन निर्णय घेईल. कायद्यातील सदर तरतुदीनुसार प्राप्त होणारे अर्ज विशिष्ट कालमर्यादेत निकाली काढण्याची तरतुद करण्यात आलेली नाही. याशिवाय उक्त तरतुदीनुसार प्राप्त झालेल्या अर्जाबाबत सल्लागार समितीशी सल्लामसलत करणे राज्य शासनावर बंधनकारक आहे. सदर सल्लागार समितीशी सल्लामसलत करण्याच्या प्रक्रियेसाठी लागणारा कालावधी हा अनिश्चित असतो व त्यामुळे अशा आस्थापनांमध्ये योजनेची अंमलबजावणी करणे संबंधित मंडळांस शक्य होत नाही व तेथील कामगार हे या कायद्याच्या संरक्षणापासून वंचित राहतात तसेच अर्जदार व्यवस्थापनास

देखील या प्रकरणी अनिश्चिततेचा सामना करावा लागतो. सबब, याबाबत सदर उपसमिती खालीलप्रमाणे शिफारस करीत आहे -

- **शिफारस- कलम-५ अंतर्गत प्राप्त प्रकरणांमध्ये सल्लागार समितीशी सल्लामसलत करुन निर्णय घेण्याची तरतुद वगळण्यात यावी व खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात यावी. "असंरक्षित कामगार किंवा मालक् यांच्या कोणत्याही वर्गास एखादी योजना लागू होते किंवा कसे, याबद्दल कोणताही प्रश्न उद्भवल्यास राज्य शासनाकडे पाठविण्यात येईल आणि शासन यावर निर्णय घेईल व तो निर्णय अंतिम असेल."**

II. कलम ६-अे मधील सुधारणा –

सदर कलमातील सध्याच्या तरतुदीनुसार शासनास कोणत्याही कारणासाठी त्रिपक्षीय मंडळ स्थापन करणे शक्य नसल्यास एक सदस्यीय मंडळ म्हणून कोणत्याही व्यक्तीस नियुक्त करण्याचे अधिकार प्राप्त आहेत. सद्य:स्थितीत त्रिपक्षीय मंडळ कार्यरत नसताना मंडळाचे अध्यक्ष म्हणजेच सहायक कामगार आयुक्त अथवा त्यापेक्षा ज्येष्ठ अधिकारी यांना एक सदस्यीय मंडळ म्हणून शासनाकडून अधिसुचित करण्यात येते. त्यामुळे मंडळाचे अध्यक्ष तथा एक सदस्यीय मंडळ म्हणून काम करताना मंडळाशी संबंधित महत्वाचे धोरणात्मक निर्णय घेण्यात अडचणी येतात किंवा असा निर्णय घेतला गेला तर त्याबाबत संबंधितांकडून आक्षेप घेतले जातात. त्रिपक्षीय मंडळ गठीत नसताना मंडळाच्या अध्यक्षांनी एक सदस्यीय मंडळ म्हणून पारित केलेल्या ठरावांना माथाडी मंडळे प्रशासन संचालनालयाची पूर्व मान्यता घेऊन अंमलबजावणी करणे उचित होईल. जेणेकरुन सामुहिक जबाबदारीने व पारदर्शकपणे धोरणात्मक निर्णय होऊ शकतील.

• <u>शिफारस</u>- सदर कलमात दुरुस्ती करुन एक सदस्यीय मंडळाने पारित केलेल्या ठरावांना "माथाडी मंडळे प्रशासन संचालनालयाची" अंमलबजावणी पूर्व मान्यता घेणे बंधनकारक राहील.

III. <u>माथाडी मंडळे प्रशासन संचालनालय निर्मितीसाठी कलम ७-अे चा समावेश कायद्यात करणे</u> –

सदर प्रस्तावित संचालनालयाची निर्मिती करण्याबाबतचे सविस्तर विवेचन व समर्थन अहवालातील मंडळांच्या कामाकाजातील आर्थिक व्यवस्थापन व प्रशासकीय सुधारणा या शिर्षाखाली करण्यात आलेले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे शिफारस करण्यात येत आहे.

• <u>शिफारस-</u> सदर कायद्यात कलम ७ नंतर नव्याने कलम ७-अे पुढीलप्रमाणे समाविष्ट करावे-

"<u>७-अे</u>- अ) मंडळांवरील राज्य शासनाचे पर्यवेक्षण व नियंत्रण- या प्रयोजनार्थ माथाडी मंडळे प्रशासन संचालनालयाची निर्मिती करुन संचालक, सह-संचालक, उप संचालक, सहायक संचालक म्हणून राजपत्रित अधिकाऱ्यांना शासन राजपत्रात अधिसुचना प्रसिध्द करुन नियुक्त करेल. ब) उपकलम १ अन्वये निर्मित संचालनालय व या प्रयोजनासाठी आवश्यक असलेले मनुष्यबळ व पायाभूत सुविधांसाठीची संपूर्ण आर्थिक तरतुद मंडळांना प्राप्त होणाऱ्या प्रशासकीय निधीतून करण्यात येईल."

IV. <u>कलम १६ मधील सुधारणा</u> –

या कलमातील तरतुदीनुसार बालक या संज्ञेनुसार ज्या व्यक्तीची वयाची १४ वर्षे पूर्ण झालेली नाहीत अशा व्यक्तींना या कायद्यानुसार कामावर ठेवण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे. बालक ही संज्ञा जुन्या बाल कामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम, १९८६ नुसार समाविष्ट करण्यात

आलेली आहे. तथापि, या कायद्यात २०१६ मध्ये सुधारणा होऊन बाल व किशोरवयीन कामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम, १९८६ असे या कायद्याचे नामकरण झालेले आहे. या सुधारणेनुसार किशोरवयीन ही संज्ञा समाविष्ट करण्यात आलेली असून, या संज्ञेत ज्या व्यक्तीने वयाची १८ वर्षे पूर्ण केलेली नाहीत अशा व्यक्तींना धोकादायक व्यवसाय व प्रक्रियांमध्ये प्रतिबंध करण्यात आलेला आहे. माथाडी स्वरुपाचे काम हे शारिरीक, कष्टाचे व १८ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांकडून करुन घेतल्यास त्यांच्या शारिरीक वाढीवर विपरित परिणाम करणारे असल्याने सदर सुधारित कायद्यातील तरतुदींशी सुसंगत राहणे आवश्यक आहे.

- **<u>शिफारस</u>- माथाडी कायद्याच्या या कलमात "बालक ऐवजी किशोरवयीन" ही संज्ञा समाविष्ट करावी अशी उप समितीची शिफारस आहे.**

V. <u>कलम २७ मधील शास्ती वाढविणे</u> –

सद्य:स्थितीत या कायद्यातील अथवा नियमातील तरतुदींचा भंग झाल्यास रु. ५००/- पर्यंत वाढविता येईल एवढया रक्कमेचा दंड तसेच सदर भंग पुढेही चालू राहिल्यास प्रतिदिन रु. १००/- पर्यंत रक्कमेचा दंड करण्याची तरतुद आहे. तसेच बहुतांशी योजनांमध्ये ३ महिन्यांचा कारावास किंवा रु.५००/- पर्यंतचा दंड किंवा दोन्ही शिक्षा व पुन्हा तेच उल्लंघन केल्यास ६ महिन्यांचा कारावास किंवा रु. १०००/- पर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा अशी तरतुद आहे. अपराध सिध्दीनंतर असे उल्लंघन सुरु राहिल्यास प्रतिदिन रु.१००/- पर्यंतच्या दंडाची तरतुद आहे. सदर अधिनियम हा सामाजिक कायदा असल्याने द्रव्यदंडाची शिक्षा देण्याकडे न्यायालयांचा कल असतो. या कायद्याच्या उल्लंघनासाठी कारावासाची शिक्षा न्यायालयाने दिल्याचे आढळून येत नाही. या कायद्यातील द्रव्यदंडाची तरतुद अतिशय कमी रक्कमेची असल्याने उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींना या कायद्याची

जरब बसत नसल्याने उल्लंघन करण्याची प्रवृत्ती वाढीस लागते. सबब, अशा प्रवृत्तीस आळा घालण्यासाठी द्रव्यदंडाची रक्कम मोठया आकाराची असणे आवश्यक आहे.

- **<u>शिफारस-</u> १. जो कोणी, या अधिनियमाच्या तरतुदींचे किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांचे उल्लंघन करील, तो किमान रु. २,०००/- ते कमाल रु. १०,०००/- पर्यंत प्रति व्यक्ती प्रति त्रृटी (per breach per person) असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस आणि उल्लंघन चालू ठेवल्यास असे उल्लंघन ज्या चालू कालावधीकरीता चालू ठेवले असेल त्या कालावधीतील प्रत्येक दिवसासाठी रु. ५००/- पर्यंत असू शकेल इतक्या अतिरिक्त द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल. २. शिक्षा पात्र अपराध केल्याबद्दल सिध्दापराधी ठरविण्यात आलेली कोणतीही व्यक्ती, त्याच तरतुदींचे उल्लंघन केल्यामुळे किंवा त्या तरतुदींचे अनुपालन करण्यात कसुर केल्यामुळे झालेल्या अपराधाबद्दल पुन्हा दोषी ठरली असेल तर ती नंतरच्या सिध्दापराधाबद्दल तिला किमान रु. २०,०००/- ते कमाल रु. ५०,०००/- पर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.**

## VI) <u>अपराधांचे प्रशमन (Compounding of Offences)</u>

माथाडी अधिनियमांतर्गत योजनेची अंमलबजावणी करताना आस्थापनांची निरिक्षकांमार्फत तपासणी करुन निरिक्षण शेरे पारित केले असता, व्यवस्थापनाने जर त्रृटींची पुर्तता केली नाही, तर कलम १७ अन्वये निरिक्षक अशा आस्थापनांविरुध्द कामगार न्यायालयात खटले दाखल करत असतात आणि कामगार न्यायालयाची व्यस्तता पाहता प्रदीर्घ काळ सदर खटले प्रलंबित राहतात. हा वेळेचा अपव्यय टाळून उभयपक्षांना माथाडी अधिनियमाच्या कार्यकक्षेत आणण्याकरीता असे अपराध आपापसात मिटवण्याची तरतुद अधिनियमात

यापूर्वी नव्हती, ती तरतूद करुन सामोपचाराने कायद्याचे पालन व्हावे या हेतुने खालीलप्रमाणे शिफारस करण्यात येत आहे.

१) अपराध आपआपसात मिटविण्यासाठीचा प्रतयेक अर्ज अपचारी व्यवस्थापन मंडळ अध्यक्षांकडे खटला दाखल केल्यापासून ३० दिवसांचे आत विहीत नमुन्यात करेल.

२) मंडळ अध्यक्षांना अपराधांचे प्रशमन करणारा अधिकारी म्हणून काम पाहतील आणि मंडळ अध्यक्ष सुनावणी केलेल्या सर्व प्रकरणांचा योग्य तो रोजनामा ठेवतील.

३) अपराध आपआपसात मिटविण्याची कार्यपध्दत

एक- अर्ज प्राप्त झाल्यावर अपराधाचे प्रशमन करणारे मंडळ अध्यक्ष हे संपूर्ण कागदपत्रांची, अधिनियम आणि त्याखाली केलेले नियम, योजना यांच्या भंगाच्या स्वरुपाची तपासणी करतील आणि अर्ज प्राप्त झाल्यापासून १५ दिवसात सविस्तर आदेश काढतील. अपराधाचे प्रशमन करणारे मंडळ अध्यक्ष अपराध प्रशमन शुल्काची रक्कम निश्चित करताना भंगाची गंभीरता, अपराधाचे स्वरुप, भंगांच्या अनुषंगाने करण्यात आलेली पूर्तता आणि अभिलेखांवरील साक्षी पुरावा या गोष्टी विचारात घेतील. प्रशमन शुल्क प्राप्त झाल्यावर मंडळ अध्यक्ष ते शुल्क मंडळाच्या प्रशासकीय लेव्ही मध्ये जमा करण्याचे आदेश देतील आणि अशी रक्कम जमा केल्यानंतर तो अपराध आपापसात मिटविण्यात येईल आणि मंडळाचे अध्यक्षांनी नियुक्त केलेले अधिकारी त्या प्रयोजनाकरीता ठेवलेल्या नोंदवही मध्ये आवश्यक त्या नोंदी घेतील.

दोन- अपराधाचे प्रशमन करणारे मंडळ अध्यक्ष यांनी दिलेला प्रत्येक आदेश कार्यालयीन कामकाजाच्या ७ दिवसात कसूरदार मालकावर बजावण्यासाठी संबंधित मंडळ निरिक्षकाला अग्रेषित करण्यात येईल.

तीन- अपराध आपापसात मिटविण्यासाठी अपराधांचे प्रशमन करणाऱ्या मंडळ अध्यक्षांद्वारे बंधनकारक करण्यात येईल असे कमाल शुल्क या अधिनियमाद्वारे अशा अपराधांसाठी विनिर्दीष्ट करण्यात आलेल्या कमाल दंडाच्या ५० टक्क्याहून कमी असणार नाही.

चार- कलम २७ खाली खटला दाखल करण्यासाठी कालावधीची गणना करताना अपराध आपापसात मिटविण्याकरीता लागणारा कालावधी वगळण्यात येईल.

VII) कलम २८(२) मधील सुधारणा –

माथाडी अधिनियमाखालील प्रत्येक योजना आणि कलमान्वये करण्यात आलेले नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधीमंडळाचे अधिवेशन चालू असताना. एकाच अधिवेशन किंवा लागोपाठच्या किंवा अधिवेशनात, एकूण ३० दिवसांचे होईल इतक्या मुदतीकरीता. राज्य विधीमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रितीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगत नंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या योजनेत किंवा नियमात कोणतीही तरतुद अथवा नियम करु नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील तर राजपत्रात अधिसुचना प्रसिध्द करण्यात आल्याच्या दिनांकापासून, योजना किंवा अशी तरतुद किंवा नियम, यथास्थिती. असा फेरबदल केलेल्या स्वरुपातच अंमलात येईल किंवा अंमलात येणार नाही. तथापि, असे फेरबदल किंवा विलोपन यामुळे उक्त योजना, तरतुद किंवा यथास्थिती. नियम यान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याच्या वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधीग्राहयतेस बाध येणार नाही. वरील तरतुदीमुळे अनेक न्यायालयीन प्रकरणे उद्भवलेली असून. योजनेच्या अंमलबजावणी मध्ये त्यामुळे अडचणी निर्माण झालेल्या आहेत. या तांत्रिक

बाबीचा गैरफायदा काही आस्थापनांकडून वारंवार व प्रदीर्घ काळापासून घेतला जात असून, संबंधित असंरक्षित कामगार या कायद्याच्या संरक्षणापासून वंचित रहात आहेत. सबब, ही उप समिती उक्त कायदेशीर तरतुदीनंतर खालील परंतुकाचा अंतर्भाव करण्याची शिफारस करीत आहे.

• **शिफारस - "वरील तरतुदीनुसार कार्यवाही झाली नसल्यास संबंधित योजनेच्या अंमलबजावणी बाबत कोणतीही बाधा येणार नाही, तसेच अशा स्थितीत फक्त उप कलम २ ची पुर्तता झालेली नाही म्हणून कोणत्याही योजनेची वैधता कोणत्याही न्यायालयासमोर आव्हानीत करता येणार नाही."**

**ब) योजनांमधील सुधारणा –**

**I. Bio Metric पध्दतीने नोंदीत माथाडी कामगारांची हजेरी अनिवार्य करणे.**

माथाडी कामगार प्रत्यक्ष कामावर हजर नसतानाही त्यांची हजेरी लावली जाते, अशा तक्रारी मंडळांना प्राप्त होतात. त्यामुळे जे माथाडी कामगार प्रत्यक्ष कामावर हजर आहेत त्यांनाच झालेल्या कामाचा मोबदला मिळावा व त्यांच्या उपस्थितीवर नियंत्रण राहावे यासाठी खालील तरतुदीचा अंतर्भाव योजनेत करणे आवश्यक आहे.

**शिफारस – माथाडी कामगारांची हजेरी शक्य असेल तेथे किंवा आवश्यक असेल तेथे Bio Metric (In and Out) पध्दतीने नोंदविण्यासाठी मंडळाने आवश्यक उपाययोजना कराव्यात.**

**II. निरिक्षकाने पारित केलेले निरिक्षण शेरे २४ तासाच्या आत मंडळाला व संचालनालयाला ई-मेल द्वारे पाठविणे.**

अधिनियमांच्या कलम १ (५) अन्वये अधिनियम लागू केल्याचे दिनांकापासून किंवा आस्थापनेस सदर अधिनियम लागू झाल्या

दिवसापासून आस्थापनांनी संबंधित माथाडी मंडळात नोंदीत होणे बंधनकारक आहे. तथापि, अनेक आस्थापना माथाडी मंडळांत नोंदीत होत नाहीत. करिता मंडळाचे निरिक्षक अशा आस्थापनांना भेटी देऊन निरिक्षण शेरे पारित करुन सदर आस्थापनांना मंडळात नोंदीत होण्याबाबत आदेशित करीत असतात. तसेच तेथील असंरक्षित माथाडी स्वरुपाचे काम करणाऱ्या कामगारांना मंडळात नोंदीत करण्याबाबत कार्यवाही करीत असतात. अनेकवेळा व्यवस्थापन मंडळात नोंदीत होण्याचे टाळते आणि तेथील असंरक्षित माथाडी स्वरुपाचे काम करणाऱ्या कामगारांना तात्काळ कामावरुन कमी करते. परिणामी असे कामगार बेरोजगार होतात. अशा कामगारांना संरक्षण देण्याच्या हेतुने व्यवस्थापन जरी मंडळात नोंदीत झाले नसले तरी नोंदीत करण्याकरीता व त्यांचा रोजगार टिकवून ठेवण्याकरीता निरिक्षकांनी भेट देऊन पारित केलेले निरिक्षण शेरे हे तात्काळ माथाडी मंडळे प्रशासन संचलनालय आणि संबंधित मंडळ यांना सदर निरिक्षण शेरे ई-मेलद्वारे स्कॅन करुन पाठविण्यात यावेत. जेणेकरुन सदरहू निरिक्षण शेरे व त्यातील कामगारांची माहिती अंतिम राहील, त्याकरीता खालीलप्रमाणे शिफारस करण्यात येत आहे.

- **<u>शिफारस</u>- निरिक्षकांनी नोंदीत/अनोंदीत मालक आस्थापनांमध्ये पारित केलेले निरिक्षण शेरे त्या आस्थापनेत काम करताना आढळलेल्या व आस्थापनेच्या अभिलेख्यानुसार नमूद केलेल्या कामगारांच्या यादीसह मंडळास तसेच माथाडी मंडळे संचालनालयास २४ तासाचे आत ई-मेलद्वारे सादर करावेत. तसेच अनोंदीत आस्थापनांमध्ये माथाडी स्वरुपाचे काम सुरु असल्यास मालक आस्थापना नोंदीत होवो अथवा न होवो निरिक्षणाच्या वेळी आढळून आलेल्या माथाडी कामगारांची नोंदणीची प्रक्रिया सुरु करावी.**

**निरिक्षणाच्या वेळी आढळून आलेल्या माथाडी कामगारांची नोंदणीची प्रक्रिया सुरु करावी.**

III. <u>चारित्र्य पडताळणी अनिवार्य करणे.</u>

विशेषत: मुंबई, पुणे व इतर मोठया शहरांमध्ये माथाडी स्वरुपाचे काम करण्यासाठी मोठया प्रमाणात परराज्यातील कामगार येत असतात. तसेच राज्यातील इतर जिल्हयांमधून या कामासाठी शहरांमध्ये स्थलांतरीत होणाऱ्या कामगारांचीही संख्या लक्षणीय आहे. अशा कामगारांची मंडळात नोंदणी करताना योग्य व खऱ्या कामगारांची नोंदणी व्हावी. तसेच गुन्हेगारी पार्श्वभूमीची व्यक्ती माथाडी कामगार म्हणून मंडळात नोंदीत होऊ नये यादृष्टीने पोलीस विभागाकडून चारित्र्य पडताळणी होणे आवश्यक आहे. शासनाने या कामी परिपत्रकांद्वारे पोलीस विभागाकडून आवश्यक तेथे चारित्र्य पडताळणी करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत. तथापि, सदर बंधनकारक करण्याची तरतुद योजनेत करणे आवश्यक आहे.

- **<u>शिफारस</u> - प्रत्येक मंडळाने माथाडी कामगारांची नोंदणी करताना त्याचे सध्याचे वास्तव्य असलेले व त्याचे मूळगाव ज्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत येते तेथील चारित्र्य पडताळणी अहवाल प्राप्त करुन घेणे बंधनकारक करावे.**

IV. <u>**नविन मालक नोंदणी संदर्भात निरिक्षकाने प्रत्यक्षात निरिक्षण भेट अहवाल सादर करुन नोंदणी करणे.**</u>

मालक नोंदणीसाठी विहीत नमुन्यातील अर्ज व त्यासोबत विहीत केलेली फी या दोन गोष्टींची पुर्तता करण्याची तरतुद योजनांमध्ये दिसून येते. सदर नोंदणी करताना संबंधित मालक खरोखरच कार्यरत आहे काय, त्यांच्याकडे चालणारे काम माथाडी स्वरुपाचे आहे काय, तसेच त्या मालकाकडे माथाडी स्वरुपाचे काम करणारे नेमके कोणते कामगार आहेत व असे कामगार

कधीपासून काम करतात, अशा स्वरुपाची चौकशी करण्याचे बंधन योजनेत दिसून येत नाही.

- **<u>शिफारस</u> - कोणत्याही नविन मालकाची नोंदणी करताना त्या-त्या मंडळातील निरिक्षकाने प्रत्यक्षात निरिक्षण भेट देऊन संबंधित मालक खरोखरच कार्यरत आहे काय, त्यांच्याकडे चालणारे काम माथाडी स्वरुपाचे आहे काय, तसेच त्या मालकाकडे माथाडी स्वरुपाचे काम करणारे नेमके कोणते कामगार आहेत व असे कामगार कधीपासून काम करतात, याबाबत खातरजमा करुन अहवाल मंडळास सादर करावा. त्यानंतर मंडळाच्या सचिवांनी त्याची पडताळणी व खातरजमा करुनच नोंदणी करावी.**

V. **<u>माथाडी मंडळात मजूरी व लेव्हीचा भरणा धनादेशाद्वारे तसेच माथाडी कामगारांचे वेतन व इतर कायदेशीर देणी केवळ बँकेद्वारेच अदा करणे.</u>**

माथाडी मंडळांमध्ये सद्य:स्थितीत बहुतांश मालक मजूरी व लेव्हीचा भरणा धनादेशाद्वारे करतात. तसेच कार्यरत असलेल्या माथाडी कामगारांचे वेतन व इतर कायदेशीर देणी प्रशासकीय सोयीसाठी बहुतांश मंडळे बँकेच्या माध्यमातून अदा करतात. तथापि, सदर बाबत माथाडी कायदा अथवा योजनांमध्ये कुठलीही तरतुद नसल्याने मंडळे व नोंदीत मालकांवर अशा पध्दतीने व्यवहार करणे बंधनकारक नाही. आयकर कायद्यातील सुधारित तरतुदीनुसार विशिष्ट मर्यादे पलिकडे रोखीने मंडळाच्या खात्यावर भरणा झाल्यास आयकर विभागाकडून चौकशी होते. सदर चौकशीसाठी मंडळास सनदी लेखापालाची नियुक्ती करावी लागते. त्यामुळे मंडळाचा वेळ व पैसा नाहक खर्च होतो. मजूरी व लेव्ही रोखीने खात्यात जमा केल्याने कोणाकडून किती मजूरी व लेव्ही प्राप्त झालेली आहे यांचा ताळमेळ करण्यात समस्या निर्माण होतात. माथाडी मंडळात मजूरी व लेव्हीचा भरणा धनादेशाद्वारे तसेच माथाडी कामगारांचे वेतन व इतर

कायदेशीर देणी केवळ बँकेद्वारेच अदा करणे, योजनेत तरतुद करुन बंधनकारक करणे आवश्यक आहे.

- <u>शिफारस</u> – **मजूरी व लेव्हीचा भरणा हा संबंधित नोंदीत मालकाने केवळ धनाकर्षक/धनादेशाद्वारे (D.D./Cheque) करावा. तसेच नोंदीत माथाडी कामगारांची मजूरी व इतर कायदेशीर देणी मंडळाने फक्त शासनाने मंजूर केलेल्या व वेतन प्रदान अधिनियम,१९३६ च्या तरतुदीस अधीन राहून ५० टक्के पेक्षा अधिक नाही इतक्या रक्कमेच्या कपाती करुन केवळ बँकेद्वारेच अदा करावे.**

## २) सामाजिक सुरक्षा योजनांचे व्यवस्थापन

माथाडी स्वरुपाचे काम करणारे कामगार असंघटीत कामगार असल्याने त्यांना सामाजिक सुरक्षितता प्रदान करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ या कायद्याची व त्याअंतर्गत विविध योजनांची निर्मिती करण्यात आलेली आहे. त्यामुळे नोंदीत माथाडी कामगारांसाठी माथाडी मंडळांच्या माध्यमातून भविष्य निर्वाह निधी, उपदान तसेच काही मंडळांमध्ये वैयक्तिक अपघात विमा व मुंबईतील काही मंडळांच्या कामगारांना माथाडी हॉस्पिटलच्या माध्यमातून वैद्यकीय उपचार अशा सामाजिक सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. तसेच कर्मचारी नुकसान भरपाई अधिनियम, १९२३ नुसार देय होणाऱ्या नुकसान भरपाईबाबत व प्रसुति लाभ अधिनियम, १९६१ अंतर्गत देय होणाऱ्या लाभांबाबत सदर अधिनियमात तरतुद करण्यात आलेली आहे. सदर उपाययोजनांसाठी आवश्यक असलेल्या निधीची तरतुद मंडळास प्राप्त होणाऱ्या लेव्हीतून करण्यात येते.

सदर सामाजिक सुरक्षा उपाययोजनांसाठी प्राप्त होणाऱ्या निधीचे व्यवस्थापन संबंधित मंडळाच्या स्तरावर करण्यात येते. त्यामुळे सामाजिक सुरक्षितता घटकासाठी

संबंधित मंडळाने लेव्ही मध्ये केलेल्या तरतुदीच्या प्रमाणात व त्यावर प्राप्त होणाऱ्या व्याजदरानुसार कामगारांना लाभ प्राप्त होत असल्याने मंडळ निहाय या लाभांमध्ये भिन्नता आढळून येते. सबब, सर्व नोंदीत माथाडी कामगारांना सामाजिक सुरक्षिततेचे समान व अधिक प्रमाणात लाभ मिळण्याच्या दृष्टीकोनातून खालील शिफारशी करण्यात येत आहेत –

I. <u>भविष्य निर्वाह निधी</u> -

सर्व माथाडी मंडळांची राज्य स्तरावर एक भविष्य निर्वाह निधी ट्रस्ट स्थापित करुन त्याद्वारे या प्रयोजनासाठी सर्व मंडळांना प्राप्त होणाऱ्या निधीचे एकत्रित व्यवस्थापन केल्यास अशा ट्रस्टकडे जमा होणाऱ्या एकत्रित निधीवर अधिक आकर्षक व्याज प्राप्त होऊ शकते. सध्या सर्व माथाडी मंडळांकडील एकत्रित निधी सुमारे रु २,००० कोटी असून, या निधीची गुंतवणूक इतर सुरक्षित योजनांमध्ये केल्यास त्यावर अधिक आकर्षक परतावा मिळू शकतो. याशिवाय कर्मचारी भविष्य निधी संगठन (EPFO) यांच्या निकषांनुसार प्रस्तावित भविष्य निधी ट्रस्टची नोंदणी करण्यात आल्यास ट्रस्टचे सभासद माथाडी कामगारांना निवृत्ती वेतन योजना देखील लागू होईल.

- **<u>शिफारस</u> – कर्मचारी भविष्य निधी संगठन यांच्या निकषानुसार सर्व माथाडी मंडळांसाठी एकच भविष्य निधी ट्रस्ट स्थापन करुन त्याद्वारे त्यांच्याकडील भविष्य निर्वाह निधीच्या रक्कमेचे व्यवस्थापन करण्यात यावे.**

II. <u>उपदान (ग्रॅच्युईटी)</u> -

उपदान प्रदान अधिनियम, १९७० च्या तरतुदी आधारभूत मानून नोंदीत माथाडी कामगारांना त्यांनी अर्जित केलेल्या शेवटच्या १२ महिन्यातील सरासरी प्रतिदिन वेतन विचारात घेऊन उपदान रक्कमेची परिगणना करण्यात येते. या

तरतुदीचा माथाडी कामगारांमार्फत शेवटचे १२ महिने मजूरी जास्तीत जास्त दाखवून गैरफायदा घेण्यात येतो, यामुळे मंडळांचे आर्थिक नुकसान होते. तथापि, उपदान या शिर्षाखाली प्राप्त होणारी लेव्ही मधील रक्कम दीर्घकालीन मुदतठेव म्हणून बँकेत गुंतविली जाते व त्यावरील माथाडी कामगारांच्या नावाने मंडळाकडे प्राप्त होणाऱ्या रक्कमेतून देय होणारी उपदानाची रक्कम संबंधित माथाडी कामगारास वा त्याच्या वारसदारास अदा केली जावी व त्यावरील प्राप्त व्याजाच्या रक्कमेतून माथाडी कामगारांच्या कल्याणकारी योजनेकरीता तरतुद करुन त्यातून कल्याणकारी योजना राबविण्यात याव्यात. तसेच उपदान योजनेचा लाभ मिळणेकामी माथाडी कामगाराच्या सेवेचा कालावधी मर्यादित केल्याने विहीत कालावधीपेक्षा कमी काम केलेल्या माथाडी कामगारांना उपदानाचा लाभ मिळत नाही, यासाठी खालीलप्रमाणे शिफारस करण्यात येत आहे.

• **शिफारस – विहीत कालावधी विनिर्दीष्ट न करता, उपदान या शिर्षाखाली माथाडी कामगारांच्या नावाने जमा होणारी लेव्ही मधील संपूर्ण रक्कम संबंधित माथाडी कामगारास अदा करण्यात यावी.**

III. वैयक्तिक अपघात विमा -

माथाडी कामगारांच्या कामाचे स्वरुप विचारात घेता त्यांना अपघात विम्याचे संरक्षण असणे अत्यावश्यक आहे. माथाडी कायद्याने कर्मचारी अपघात नुकसान भरपाई अधिनियम, १९२३ नुसार काम करताना अपघात झाल्यास त्याचे दायित्व निश्चित केलेले आहे. तथापि, कामाचे स्वरुप विचारात घेता फक्त काम करताना अपघात झाल्यास मिळणारे संरक्षण या ठिकाणी पुरेसे वाटत नाही. सबब, या सर्व कामगारांना ते माथाडी कामगार म्हणून कार्यरत असताना फक्त काम करतानाच नव्हे तर २४ तासासाठी अपघात संरक्षण मिळणे आवश्यक आहे. एखादा कामगार अपघातात जखमी झाल्यास व उपचाराकरीता रुग्णालयात

दाखल असल्यास, त्याच्या उपचार खर्चाची व उपचार कालावधीतील कामावरच्या अनुपस्थितीमुळे झालेल्या वेतनहानीची प्रतिपूर्ती होणे आवश्यक आहे.

- <u>शिफारस</u> - **प्रत्येक नोंदीत माथाडी कामगाराच्या समुचित रक्कमेचा अपघात विमा उतरवून औषधोपचार खर्चाची व उपचार कालावधीतील कामावरच्या अनुपस्थितीमुळे झालेल्या वेतनहानीची प्रतिपूर्ती होईल याची तरतुद करावी.**

IV. <u>दुर्बल घटकांसाठी शासनाच्या विविध आरोग्य विषयक योजना</u> –

राज्य शासन कमकुवत व दुर्बल घटकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी विविध योजना लागू करत असते. या योजनांची बहुतांश वर्गणी राज्य व केंद्र शासनाकडून भरली जाते व अतिशय नाममात्र वर्गणी संबंधित लाभार्थ्यांकडून घेण्यात येते. माथाडी कामगार हे सुध्दा कमकुवत व दुर्बल घटकात मोडत असल्याने अशा योजनांपैकी आवश्यक वाटणाऱ्या योजनांचा लाभ कार्यरत माथाडी कामगारांना विनामूल्य मिळवून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही मंडळांनी करणे गरजेचे आहे.

- <u>शिफारस</u> - **माथाडी मंडळांनी शासनाच्या** ज्या आरोग्य **विषयक योजनांचा लाभ कार्यरत माथाडी कामगारांना** देण्याचा निर्णय **घेतला असेल अशा योजनांसाठी लाभार्थी माथाडी कामगाराची वर्गणी प्राप्त होणाऱ्या लेव्ही मधून भरावी.**

## ३) मंडळांच्या कामकाजातील आर्थिक व्यवस्थापन व प्रशासकीय सुधारणा

राज्यात सद्य:स्थितीत ३६ माथाडी मंडळे कार्यरत असून या सर्व मंडळांचा कारभार महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमीजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९, संबंधित मंडळाची योजना आणि उक्त अधिनियमांतर्गत

कलम ७ (४) अन्वये शासनास प्राप्त झालेल्या अधिकारानुसार वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या निदेशानुसार चालतो. राज्यातील या ३६ मंडळांची एकत्रित वार्षिक उलाढाल सुमारे रु. २,३०० कोटी असून, या मंडळांमध्ये २,१२,११४ माथाडी कामगार नोंदीत झालेले आहेत. त्यापैकी १,११,५२३ माथाडी कामगार कार्यरत आहेत. या सर्व मंडळांचे दैनंदिन कामकाज पार पाडण्यासाठी तृतीय व चतुर्थ श्रेणीतील ५८६ कर्मचाऱ्यांची मंडळांकडून नियुक्ती करण्यात आलेली असून ११३ एवढे कर्मचारी बाहययंत्रणेद्वारे अथवा निवृत्त कर्मचाऱ्यांमधून नेमण्यात आलेले आहेत. उक्त अधिनियमाच्या तरतुदीनुसार स्थापन करण्यात आलेली मंडळे स्वायत्त, वैधानिक मंडळे असल्याने तसेच या मंडळाच्या कारभारासाठी शासनाकडून कोणतेही अनुदान प्राप्त होत नसल्याने उक्त कलम ७(४) तसेच अध्यक्ष, सचिवांची नेमणूक व त्रिपक्षीय/एक सदस्यीय मंडळाची नेमणूक आणि मंडळाचे अधिक्रमण करणे तसेच वार्षिक अहवालांना मंजूरी देणे या व्यतिरिक्त राज्य शासनाचे मंडळाच्या दैनंदिन कारभारावर कोणतेही नियंत्रण नसते.

या सर्व मंडळांची वार्षिक उलाढाल, मंडळांमार्फत नेमण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या व प्राप्त परिस्थितीत मंडळांच्या कामकाजात निर्माण होत असलेल्या अडचणी विचारात घेता, ही सर्व मंडळे व राज्य शासन यांच्यातील दुवा म्हणून कामगार आयुक्त कार्यालयातील सह कामगार आयुक्त (माथाडी) यांच्या नियंत्रणाखाली कार्यरत असलेली माथाडी शाखेची यंत्रणा अतिशय अपर्याप्त व तुटपुंजी आहे.

माथाडी कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी स्थापन करण्यात आलेली वैधानिक माथाडी मंडळे स्वायत्त असल्याने या मंडळांसाठी आवश्यक असलेला अधिकारी/कर्मचारी वर्ग नेमण्याचे अधिकार मंडळांना आहेत. या मंडळांना आवश्यक असलेल्या कर्मचारीवर्गाची भरती शासनाच्या धोरणानुसार मंडळांनी करणे अपेक्षित आहे. तथापि, काही मंडळांमध्ये पूर्वी झालेल्या नोकर भरत्यांबाबत विहीत

पध्दतीचा अवलंब झालेला नसल्याच्या तक्रारी शासनाकडे येत असतात. तसेच माथाडी मंडळांचे आकृतीबंध निश्चित झालेले नसल्याने मंजूर पदे निश्चित करता येत नाहीत. या मंडळांसाठी आवश्यक असलेल्या पदांचे सेवाप्रवेश नियम देखील अद्यापपर्यंत अंतिम करण्यात आलेले नाहीत. अशा स्थितीत रिक्त झालेल्या पदांवर नव्याने भरती करण्यासाठी अडचणी निर्माण होतात. ही स्थिती मागील अनेक वर्षांपासून असल्याने सर्व मंडळांमध्ये मोठया प्रमाणात पदे रिक्त आहेत, किंबहूना नव्याने स्थापन केलेल्या काही मंडळांमध्ये आवश्यक पदे देखील न भरता इतर माथाडी मंडळाच्या कर्मचाऱ्यांकडे किंवा कामगार कार्यालयातील कर्मचाऱ्यांकडे अशा पदांचा अतिरिक्त कार्यभार सोपवून मंडळाचे कामकाज कसेबसे चालविले जाते. त्यामुळे भरती प्रक्रिया राबविण्यासाठी आकृतीबंध निश्चित करुन शासकीय धोरणानुसार आणि कायदेशीर बाबी विचारात घेऊन केंद्रीय पध्दतीने भरती प्रक्रिया राबविणे तसेच शासकीय धोरणानुसारच या कर्मचाऱ्यांबाबत पदोन्नतीचे धोरण राबविणे आवश्यक झालेले आहे.

विविध मंडळांमध्ये कार्यरत असलेल्या एका संवर्गातील पदांच्या सेवाशर्ती भिन्न असल्याचेही दिसून येते. तसेच कार्मिक अधिकारी, लेखापाल, निरिक्षक या संवर्गातील कार्यकारी पदांवर कार्यरत असलेले कर्मचारी तसेच इतर कर्मचारी हे त्या-त्या मंडळाचे कर्मचारी असल्याने ते वर्षानुवर्ष सेवानिवृत्त होईपर्यंत एकाच मंडळात कार्यरत असतात. सदर बाब कार्यकारी पदांबाबत शासनाच्या बदली धोरणाशी सुसंगत नाही. त्यामुळे एका संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती समान पातळीवर आणून मंडळातील सर्व कर्मचाऱ्यांच्या शासनाच्या प्रचलित धोरणानुसार नियतकालिक व प्रशासकीय बदल्या किमान विभागीय स्तरावर केल्यास, मंडळांच्या कामकाजामध्ये गतिशिलता, पारदर्शकता राखण्यासाठी व कारभार निःपक्षपणे होण्यासाठी निश्चितच मदत होईल.



...गास बहुजन ...
...र यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

पध्दतीचा अवलंब झालेला नसल्याच्या तक्रारी शासनाकडे येत असतात. तसेच माथाडी मंडळांचे आकृतीबंध निश्चित झालेले नसल्याने मंजूर पदे निश्चित करता येत नाहीत. या मंडळांसाठी आवश्यक असलेल्या पदांचे सेवाप्रवेश नियम देखील अद्यापपर्यंत अंतिम करण्यात आलेले नाहीत. अशा स्थितीत रिक्त झालेल्या पदांवर नव्याने भरती करण्यासाठी अडचणी निर्माण होतात. ही स्थिती मागील अनेक वर्षांपासून असल्याने सर्व मंडळांमध्ये मोठया प्रमाणात पदे रिक्त आहेत. किंबहूना नव्याने स्थापन केलेल्या काही मंडळांमध्ये आवश्यक पदे देखील न भरता इतर माथाडी मंडळाच्या कर्मचाऱ्यांकडे किंवा कामगार कार्यालयातील कर्मचाऱ्यांकडे अशा पदांचा अतिरिक्त कार्यभार सोपवून मंडळाचे कामकाज कसेबसे चालविले जाते. त्यामुळे भरती प्रक्रिया राबविण्यासाठी आकृतीबंध निश्चित करुन शासकीय धोरणानुसार आणि कायदेशीर बाबी विचारात घेऊन केंद्रीय पध्दतीने भरती प्रक्रिया राबविणे तसेच शासकीय धोरणानुसारच या कर्मचाऱ्यांबाबत पदोन्नतीचे धोरण राबविणे आवश्यक झालेले आहे.

विविध मंडळांमध्ये कार्यरत असलेल्या एका संवर्गातील पदांच्या सेवाशर्ती भिन्न असल्याचेही दिसून येते. तसेच कार्मिक अधिकारी, लेखापाल, निरिक्षक या संवर्गातील कार्यकारी पदांवर कार्यरत असलेले कर्मचारी तसेच इतर कर्मचारी हे त्या-त्या मंडळाचे कर्मचारी असल्याने ते वर्षानुवर्ष सेवानिवृत्त होईपर्यंत एकाच मंडळात कार्यरत असतात. सदर बाब कार्यकारी पदांबाबत शासनाच्या बदली धोरणाशी सुसंगत नाही. त्यामुळे एका संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती समान पातळीवर आणून मंडळातील सर्व कर्मचाऱ्यांच्या शासनाच्या प्रचलित धोरणानुसार नियतकालिक व प्रशासकीय बदल्या किमान विभागीय स्तरावर केल्यास, मंडळांच्या कामकाजामध्ये गतिशिलता, पारदर्शकता राखण्यासाठी व कारभार नि:पक्षपणे होण्यासाठी निश्चितच मदत होईल.

राज्य शासनाच्या सेवेतील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९६१ लागू आहेत. या नियमानुसार त्यांच्या सेवाशर्तींचे नियमन केले जाते, याच नियमांनुसारच कर्मचाऱ्यांना/अधिकाऱ्यांना आपल्यावर झालेल्या अन्यायाबाबत प्रशासकीय न्यायाधिकरणाकडे दाद मागता येते. माथाडी मंडळांचे कर्मचारी हे राज्य शासनाचे सेवक नसल्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९६१ या कर्मचाऱ्यांना आपोआप लागू होत् नाहीत. तथापि, या नियमाप्रमाणे मंडळांतील कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्तींचे नियमन करण्याबाबत बहुतांश मंडळांनी ठराव पारित केलेले आहेत. महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९६१ नुसार मंडळातील कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्तींचे काटेकोरपणे नियमन व्हावे यासाठी केंद्रीकृत स्थायी यंत्रणा निर्माण होणे आवश्यक आहे.

या सर्व माथाडी मंडळांमध्ये कार्यालयीन कामकाजासाठी लागणारी स्टेशनरी (प्रिंटींगसह), फर्निचर, वाहन, कार्यालयीन इमारत/जागा, संगणक, सॉफ्टवेअर, सर्व्हर, वातानुकूलित यंत्र, वॉटर कुलर, जनरेटर, इन्व्हर्टर इत्यादी बाबींची नियमितपणे व गरजेनुसार मंडळस्तरावर प्रचलित पध्दतीने खरेदी करण्यात येते. सदर खरेदी एकत्रितपणे राज्यस्तरावर झाल्यास आर्थिक, गुणात्मक व खरेदी पश्चात सेवा यादृष्टीकोनातून अधिक फायदेशीर होऊ शकते. तथापि, सद्य:स्थितीत अशी कोणतीही राज्यस्तरीय यंत्रणा या प्रयोजनासाठी उपलब्ध नाही.

सर्व माथाडी मंडळांना लेव्हीच्या माध्यमातून प्राप्त होणारा निधी एकूण मजूरीच्या मंडळ निहाय ३०% ते ४५% पर्यंत असून, या निधीची भविष्य निर्वाह निधी, उपदान, बोनस, प्रशासकीय निधी इत्यादी शिर्षांतर्गत प्रतिमहा राष्ट्रीयकृत बँकांमध्ये मुदतठेवींच्या स्वरुपात गुंतवणूक करणे अपेक्षित असते. सदर गुंतवणूकीची वारंवारीता विचारात घेता प्रत्येक मंडळाच्या मुदतठेवींच्या पावत्यांची संख्या मोठया प्रमाणावर वाढत असते. त्यामुळे मुदतठेवींच्या पावत्यांचे व्यवस्थापन हे प्रत्येक मंडळासमोरील आव्हान असून, अशा पावत्यांचा दुरुपयोग करुन मंडळाच्या ठेवींचा अपहार झाल्याची

प्रकरणे समोर आलेली आहेत. सबब, या बाबतीतील संभाव्य गैरप्रकार टाळून लेव्हीद्वारे प्राप्त होणारी रक्कम सुरक्षितपणे व सुव्यवस्थितपणे गुंतविली जाईल या प्रयोजनार्थ देखील केंद्रीकृत व्यवस्था निर्माण करणे गरजेचे झालेले आहे.

सर्व माथाडी मंडळे वैधानिक मंडळे असल्याने त्यांचे नियमित लेखापरिक्षण करुन वार्षिक अहवाल विधीमंडळाच्या पटलावर ठेवणे सर्व मंडळांवर बंधनकारक आहे. मंडळाच्या दैनंदिन कारभारातला अतिशय महत्त्वाचा असलेला घटक म्हणजे वित्तीय व्यवस्थापन असून, या कामासाठी बहुतांश मंडळांमध्ये उचित प्रशिक्षण प्राप्त व सक्षम कर्मचारीवर्गाचा अभाव दिसून येत आहे, त्यामुळे सद्य:स्थितीत कर्मचाऱ्यां-अभावी अथवा सुव्यवस्थापना अभावी अनेक मंडळांचे लेखापरिक्षण अद्ययावत असल्याचे दिसून येत नाही. प्रचलित पध्दतीनुसार शासनाने सुचिबध्द (Empanelled) केलेल्या सनदी लेखापालांकडून (C.A.) सदर लेखापरिक्षण विहीत पध्दतीचा अवलंब करुन करण्यात येते. दिनांक ०६ एप्रिल, २०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार सनदी लेखापाल ३ वर्ष कालावधीसाठी सुचिबध्द करण्यात आलेले होते. तथापि, या सुचिस वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. याशिवाय बहुतांश मंडळांमध्ये वैधानिक लेखापरिक्षणा व्यतिरिक्त अंतर्गत लेखापरिक्षणासाठी देखील सनदी लेखापालाची नियुक्ती करण्यात येते, अंतर्गत लेखापरिक्षणासाठी सनदी लेखापाल शासनाने सुचिबध्द केलेले नाहीत. या कामासाठी मंडळ स्तरावर निविदा मागवून सनदी लेखापालांच्या नेमणूका केल्या जातात. माथाडी कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीचे व उपदान फंडाचे देखील लेखापरिक्षण करण्याबाबत शासनाच्या सुचना असल्याने या कामी देखील वर नमूद केल्याप्रमाणे सनदी लेखापरिक्षकांची मंडळ स्तरावर नियुक्ती केली जाते. त्याच बरोबर आयकर कायद्यांतर्गत विविध विवरणपत्रे दाखल करणे, या कायद्यांतर्गत सुट मिळण्यासाठी संबंधित आयकर कार्यालयात अर्ज दाखल करुन सुनावण्यांसाठी उपस्थित राहून आवश्यक कागदपत्रे सादर करणे व अधिकाऱ्यांसमोर युक्तीवाद करणे, वस्तु व सेवा कर (GST) कायद्यांतर्गत देखील अशा पध्दतीची

कार्यवाही करण्यासाठी मंडळ स्तरावर सनदी लेखापालांची नियुक्ती केली जाते. याबाबत देखील एकत्रित यंत्रणेमार्फत कार्यवाही झाल्यास श्रम, वेळ व आर्थिक बचत होऊ शकते.

राज्यातील बहुतांश मंडळांचा कारभारातील किमानपक्षी वेतन, भविष्य निर्वाह निधी, उपदान इत्यादी घटकांचे प्रशासनीक व्यवस्थापन संगणीकृत झालेले आहे. माथाडी मंडळांनी गरजेनुसार व उपलब्धतेनुसार स्थानिक पातळीवरील सेवा पुरवठादारांकडून संगणकीय प्रणाली विकसित करुन घेऊन त्याद्वारे सदर काम पार पाडले जाते. हे काम संगणकीय प्रणालीद्वारे करणे ही काळाची गरज झालेली आहे. तथापि, सर्व मंडळांसाठी एक प्रकारची संगणक प्रणाली विकसित करुन, प्रचलित संगणक प्रणालीतील माहिती त्यामध्ये संपादित करुन एकच संगणक प्रणालीद्वारे कारभार चालविल्यास या प्रयोजनासाठी प्रत्येक मंडळास वार्षिक देखभाल कंत्राटापोटी द्यावा लागणारा खर्च निश्चितपणे कमी करता येऊ शकतो. त्यासाठी सर्व मंडळांना सेवा देणारी स्थायी स्वरुपाची माहिती तंत्रज्ञान यंत्रणा निर्माण करणे आवश्यक वाटते.

माथाडी मंडळांच्या माध्यमातून माथाडी कायद्याची अंमलबजावणी करीत असताना अनेक न्यायालयीन प्रकरणे उद्भवतात. अशा न्यायालयीन प्रकरणांमध्ये मंडळाची बाजू मांडण्यासाठी वकीलांची (Advocate) नेमणूक मंडळ स्तरावर केली जाते. सदर नेमणूकीबाबत शासनाने माथाडी मंडळांना कोणतीही मार्गदर्शक तत्वे घालून दिलेली नाहीत. त्यामुळे न्यायालयीन प्रकरणाचे स्वरुप व गांभीर्य लक्षात घेऊन स्थानिक उपलब्धतेनुसार तसेच प्रकरणाच्या गरजेनुसार मंडळांकडून वकील नेमले जातात. सर्वसाधारणपणे सर्व माथाडी मंडळांची अंमलबजावणीच्या दृष्टीकोनातून निर्माण होणारी न्यायालयीन प्रकरणे समान स्वरुपाची असतात. तथापि, काही वेळा फौजदारी स्वरुपाच्या प्रकरणांमध्ये देखील मंडळांना वकील नेमावा लागतो. सबब, याबाबत देखील सर्व मंडळांसाठी एकत्रितपणे वकीलांना सुचिबध्द (Empanelled) करुन कार्यवाही केल्यास अथवा सर्व मंडळांसाठी एक विधी कक्ष निर्माण केल्यास

निश्चितपणे आर्थिक बचत होऊन सर्व न्यायालयीन प्रकरणे कालमर्यादेत हाताळण्याबाबत जबाबदारी निश्चित होईल.

- **<u>शिफारस</u> - माथाडी मंडळांच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी व प्रशासकीय कामकाजात सुधारणा करण्यासाठी वरीलप्रमाणे उपाययोजना करणे आवश्यक असून, त्यासाठी राज्यात नगर परिषदांवर पर्यवेक्षण व नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने १९६५ साली निर्माण केलेल्या नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या धर्तीवर माथाडी मंडळांची वैधानिक स्वायत्तता व त्रिपक्षीय स्वरुप अबाधीत ठेऊन "माथाडी मंडळे प्रशासन संचालनालयाची" खालील पध्दतीने निर्मिती करण्याची शिफारस ही उप समिती करीत आहे.**

**१. महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ या कायद्यात कलम ७ नंतर नव्याने कलम ७-अे समाविष्ट करुन "७-अे- अ) मंडळांवरील राज्य शासनाचे पर्यवेक्षण व नियंत्रण- या प्रयोजनार्थ माथाडी मंडळे प्रशासन संचालनालयाची निर्मिती करुन संचालक, सह-संचालक, उप संचालक, सहायक संचालक म्हणून राजपत्रित अधिकाऱ्यांना शासन राजपत्रात अधिसुचना प्रसिध्द करुन नियुक्त करेल. ब) उपकलम-१ अन्वये निर्मित संचालनालय व या प्रयोजनासाठी आवश्यक असलेले मनुष्यबळ व पायाभूत सुविधांसाठीची संपूर्ण आर्थिक तरतुद मंडळांना प्राप्त होणाऱ्या प्रशासकीय निधीतून करण्यात येईल."**

**२. सदर संचालनालयाचे नामकरण "माथाडी मंडळे प्रशासन संचालनालय" असे असावे. या संचालनालयामध्ये राज्यातील सुरक्षा रक्षक मंडळांचा समावेश करण्याबाबतचा विचार शासनाने करावा.**

३. संचालनालयाची रचना, जबाबदाऱ्या व कर्तव्ये दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे असून, त्याप्रमाणे या संचालनालयाची निर्मिती करावी अशी या उप समितीची शिफारस आहे.

## माथाडी मंडळे प्रशासन संचालनालयाची रचना

| कामगार आयुक्त तथा संचालक | | | |
|---|---|---|---|
| सह कामगार आयुक्त (माथाडी) तथा सह संचालक | | | |
| उप संचालक (प्रशासन) | | उप संचालक (वित्त व लेखा) | उप संचालक (विधी) |
| सहायक संचालक (माहिती व तंत्रज्ञान) | सहायक संचालक (माथाडी) | सहायक संचालक (वित्त व लेखा परीक्षण) | सहायक संचालक (विधी) |

प्रस्तावित माथाडी मंडळे संचालनालयातील संचालक, सह संचालक तसेच विभाग प्रमुख उप संचालक आणि त्यांच्या नियंत्रणाखालील सहायक संचालक यांची रचना वरीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे. माथाडी मंडळे संचालनालयात सुरक्षा रक्षक मंडळांचा समावेश करावयाचा असल्यास उप संचालक (प्रशासन) या विभाग प्रमुखांच्या नियंत्रणाखाली सहायक संचालक (सुरक्षा रक्षक) या पदाचा समावेश केला जावू शकतो. सुरक्षा रक्षक मंडळांचा समावेश या संचालनालयात केल्यास **"माथाडी व सुरक्षा रक्षक मंडळे प्रशासन संचालनालय"** असे एकत्रित नामकरण होऊ शकते.

सह संचालक हे पद सह आयुक्त कामगार (माथाडी) या उपलब्ध पदाद्वारे भरले जाऊ शकते तसेच उप संचालक व सहायक संचालक ही पदे सरळसेवेने अथवा कामगार आयुक्त कार्यालयातील अनुक्रमे कामगार उप आयुक्त व सहायक कामगार आयुक्त या संवर्गातील पदांद्वारे प्रतिनियुक्तीच्या माध्यमातून भरली जाऊ शकतील.

संचालनालयाच्या वरील रचनेत सहायक संचालक या पदाच्या नियंत्रणाखाली आवश्यक कनिष्ठ अधिकारी व कर्मचाऱ्यांची आवश्यकतेनुसार सरळसेवेने अथवा प्रतिनियुक्तीद्वारे नेमणूक करणे आवश्यक राहील.

## माथाडी मंडळे प्रशासन संचालनालयाची प्रमुख कर्तव्ये व जबाबदाऱ्या

१. सर्व माथाडी मंडळांचे प्रशासकीय आर्थिक नियंत्रण करणे
२. शासनास धोरणात्मक निर्णय घेण्यास मदत करणे
३. माथाडी मंडळांच्या सर्वसाधारण कामकाजावर देखरेख व नियंत्रण ठेवणे
४. शासन आणि मंडळे यांच्यामधील दुवा म्हणून काम करणे
५. माथाडी मंडळाच्या आस्थापनेवर कार्यरत सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या आस्थापना विषयक बाबींचे व्यवस्थापन करणे
६. सर्व मंडळांच्या पदांच्या आकृतीबंधास शासनपूर्व मान्यतेने मंजूरी देणे व पद भरती प्रक्रिया राबविणे
७. सर्व मंडळाच्या आवश्यकतेनुसार खरेदी प्रक्रिया राबविणे व त्यावर नियंत्रण ठेवणे
८. मंडळांचे वित्तीय व्यवस्थापन (लेखा व गुंतवणूकीसह)
९. मंडळांची नियतकालिक व आकस्मिक तपासणी करणे
१०. आवश्यक विवरणे व प्रतिवृत्ते मागविणे
११. मंडळांच्या ठरावांचे/आदेशांची वैधानिकता तपासणे व आवश्यकतेनुसार पुनःर्निरिक्षण करणे
१२. एक सदस्यीय मंडळाच्या ठरावांना अंमलबजावणीपूर्व मान्यता देणे.
१३. शासनाच्या निदेशानुसार कार्यवाही करणे
१४. मंडळाचे वैधानिक कामकाज व त्यावर नियंत्रण ठेवणे
१५. राज्यभरातील माथाडी कामगार हिताचे रक्षण व्हावे यासाठी कायद्याची अंमलबजावणी करणे.

**( स मा प्त )**

**दिनांक : १५ डिसेंबर,२०१८** **ठिकाण : मंत्रालय, मुंबई.**